मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
नवीन प्रशासकीय भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२- २२८८०३११
मेल आयडी-
nilima.chaudhary@nic.in

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

क्रमांक- आस्था-२०२५/प्र.क्र.३२/का-१. दिनांक: ०४ एप्रिल, २०२५.

प्रति,

अवर सचिव,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
मंत्रालय, मुंबई-३२,

**विषय :-** निर्लेखित केलेल्या वाहनांची लिलावाबाबतची निविदा सूचना महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत

**संदर्भ :-** वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. डीएफपी-१०१६/प्र.क्र.०७/१६/विनियम, दि.२२.०६.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयानुसार संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये निर्लेखित करण्यात आलेल्या वाहनाच्या लिलावाबाबतची निविदा सूचना महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार या विभागाच्या अधिनस्त असलेल्या वाहन क्र. एमएच-०१ एएन-१००२ (MARUTI SUZUKI), क्र.एमएच-०१ एएन-४५६७ (होंडा सीटी) आणि क्र.एमएच-०१ एएन-५५ (ॲम्बेसिडर) या निर्लेखित वाहनांच्या निविदा सूचना, अटी व शर्तीची छायांकित प्रत या सोबत जोडली असून, सदर जाहिरात ही दिनांक ०४.०४.२०२५ पासून दिनांक १०.०४.२०२५ या कालावधीकरिता महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

(नीलिमा चौधरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत:- निविदा सूचना

## शासकीय वाहन निविदा सूचना

शासन ज्ञापन क्रमांक शासन ज्ञापन क्रमांक क्र. आस्था-२०२५/ प्र.क्र.३२/का-१, दि.०३.०४.२०२५ अन्वये वाहन क्र.एमएच-०१ एएन १००२ ( MARUTI SUZUKI ), शासन ज्ञापन क्रमांक क्र. आस्था-२०२३/प्र.क्र.११६/का-१, दि.२६.०७.२०२३ अन्वये वाहन क्र.एमएच- ०१ एएन ४५६७ (होंडा सीटी) व शासन ज्ञापन क्र. आस्था-२००९/प्र.क्र.२२३/का-१, दि.२७.०५.२०१९ अन्वये वाहन क्र.एमएच-०१ एएन ५५ (ॲम्बेसेडर) ही वाहने निर्लेखित करण्यात आली आहेत. यामुळे सदरची वाहने आहे त्या परिस्थितीत विक्री करावयाची आहेत. त्यासाठी सदर वाहन खरेदी करू इच्छिणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था ज्या किंमतीला वाहन खरेदी करू इच्छितात त्या किंमतीच्या मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | गाडीचा प्रकार/गाडीचा क्रमांक | वाहन निरीक्षणासाठी उपलब्ध असलेचे ठिकाण व वेळ | मोहोरबंद निविदा स्विकारणेची अंतिम तारीख व ठिकाण | मोहोदबंद निविदा उघडणेची तारीख वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | क्र.एमएच-०१ एएन १००२ ( MARUTI SUZUKI ) | मंत्रालय, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ | दिनांक ०९.०४.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कक्ष अधिकारी (आस्थापना), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | दिनांक ११.०४.२०२५ वेळ सकाळी १२.०० वाजता उप सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दालन |
| २. | एमएच-०१ एएन-४५६७ ( होंडा सीटी ) | | | |
| ३. | एमएच-०१ एएन-५५ ( ॲम्बेसेडर ) | शासकीय परिवहन सेवा कार्यालय इमारत, वरळी, मुंबई | | |

वाहने निरीक्षणासाठी व तापसणीसाठी स्तंभ क्र.३ मध्ये नमुद ठिकाणी ठेवण्यात आली आहेत.

१. सदर वाहने खरेदी करू इच्छिणाऱ्या व्यक्तीस व संस्थेस वाहने जेथे जसे आहे तशाच स्थितीत या तत्त्वावर घ्यावी लागतील.

२. वाहनांचे निरिक्षण करू इच्छिणाऱ्या संबधित व्यक्ती/संस्थेने कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग यांचेकडे संपर्क करून वाहनाचे निरीक्षण करावे.

३. वाहनासाठी निविदा भरून सादर करावी.

४. इसाऱ्याची रक्कम रु.२०००/- (प्रत्येक निविदेस) धनाकर्षाद्वारे रोख शाखा, महिला व बाल विकास विभाग यांचे कार्यालयात जमा करावेत. धनाकर्ष कक्ष अधिकारी, रोख शाखा, महिला व बाल विकास विभाग यांच्या नावाने काढावा.

५. इसाऱ्याची रक्कम भरणा केलेल्या धनाकर्षाची पोचपावती निविदा अर्जासोबत जुळणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याचा पुरावा सोबत जोडला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

६. निविदा उघण्याकरिता निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.

७. यशस्वी निविदा धारकास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरून एक आठवड्यात वाहनाचा ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व इसाऱ्याच्या रकमेस मुकावे लागेल.

८. विक्री अधिनियमानुसार यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो विक्रीकर भरावा लागेल. वाहनांचा (आरटीओ कार्यालयातील) कर व वाहनांचा विमा तसेच विक्रीकर भरल्याचा पुरावा प्रत्यक्ष ताबा मिळण्यापूर्वी सादर करावा लागेल. तसेच वाहनासंबधीत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता निविदाधारकास करावी लागेल.

९. यशस्वी निविदाधारक नियम व अटी करारांची पूर्तता करू शकत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निविदा रद्द करून त्याची इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

१०. मोहोरबंद निविदा पाठविताना पाकीटावर संबंधित वाहनाचा क्रमांक स्पष्टपणे लिहिलेला असावा.

११. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्वस्वी अधिकार उप सचिव, महिला व बाल विकास विभाग यांनी राखून ठेवले आहेत.

(नीलिमा चौधरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

४९१५

महाराष्ट्र शासन

क्र.आस्था-२००९/प्र.क्र.२२३/का-१
महिला व बाल विकास विभाग,
३ रा मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दिनांक: २७/०५/२०१९.

विषय :- वाहन क्रमांक MH-०१-AN-५५ (अँम्बेसिडर कार) चे निर्लेखन करण्याबाबत.

ज्ञापन :- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांना असे कळविण्यांत येते की, विभागाने मा.मंत्री, महिला व बाल विकास विभाग यांच्या करीता एप्रिल, २०१० मध्ये वाहन क्रमांक MH-०१-AN-५५ (अँम्बेसिडर कार) खरेदी केले असून सदर वाहन विभागाच्या क्र.रवका-२०१०/प्र.क्र.१११/का-१, दि.०५/०३/२०११ च्या ज्ञापनान्वये महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोगास हस्तांतरीत करण्यात आले आहे. सदर वाहनाची नियंत्रक शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांनी दि.१३/०६/२०१८ रोजी तपासणी केली आहे. हे वाहन खरेदी करुन ८ वर्षे ९ महिने झाली आहेत. या वाहनाची धावसंख्या ८५,७६९ कि.मि. इतकी झालेली आहे. सदर वाहन बंद स्थितीत असल्यामुळे त्यामध्ये मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. या प्रकारचे वाहन कंपनीने बंद केले असून वाहनाचे सुटे भाग बाजारात सहजासहजी उपलब्ध होत नाहीत. हे शासकीय वाहन निकामी ठरविण्याच्या वित्तीय अधिकार नियमावतील अटी व शर्ती ते पूर्ण करीत करत नाही. तथापि, सदर नियमावलीतील अटी पूर्ण करण्यापूर्वीच वाहन निरुपयोगी ठरविण्याचे अधिकार वित्त विभागाच्या शासननिर्णय क्र.विअप्र-१०१३/प्र.क.३०/२०१३/विनियम, दि.१७/०४/२०१५ च्या परिशिष्टामधील भाग पहिला, उपविभाग-२ मधील अनुक्रमांक- १९-क नियम क्र.६९ अन्वये प्रशासकीय प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार वाहनाची खरेदी किंमत, झालेला खर्च, दुरुस्तीचे स्वरुप व सद्य:स्थितीत बंद अवस्थेत असलेले वाहन या बाबींचे अवलोकन करता सदर वाहन यापुढे दुरुस्ती करुन वापरात ठेवणे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरणार नसल्याचे नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांनी दि.२१/०७/२०१८ च्या पत्रान्वये प्रमाणित केले आहे.

२. सबब खाली नमूद केलेले वाहन निरुपयोगी ठरविण्यात येत असून त्याच्या निर्लेखनास या ज्ञापनान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| Model | - | Ambassadar Car |
| Chassis No | - | MA7AM18MKJU003941 |
| Engine No | - | 3EIKJ 110429 |
| Registration No | - | MH-01 AN-55 |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्रिया जोशी

(प्रि.सं.जोशी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा अनुज्ञेयता)(लेखा परिक्षा), मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.

महिला व बाल विकास विभागातील शासकीय वाहन क्रमांक MH ०१ AN ४५६७ निर्लेखित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन ज्ञापन क्रमांक: आस्था २०२३/प्र.क्र.११६/का १
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २६ जुलै २०२३.

वाचा:- नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांचे पत्र क्रमांक :-जा.क्र. शापसे/वा.त./२०२३/४९९, दि. २१/७/२०२३.

ज्ञापन :

मा. सचिव, महिला व बाल विकास यांच्या वापरात असलेले शासकीय वाहन क्र. MH ०१ AN ४५६७ (होंडा सिटी) हे वाहन वाहनाची धावसंख्या १,९९,०७३ कि.मी. इतकी झाली आहे. वाहनास खरेदी करून २०१२ ते २०२३ असा ११ वर्षे इतका कालावधी झाला आहे. उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन केले असता सदर वाहनावर सन २०१२ पासून आतापर्यंत रुपये ७,१३,७६६/- इतका दुरुस्तीवर खर्च झालेला आहे. वाहन निर्लेखित करण्यासाठी वाहनाची धावसंख्या २,४०,००० कि.मी किंवा १० वर्षे वाहनाचे आयुष्य या अटीं पैकी वाहनाचे आयुष्य १० वर्षे या अटींची पुर्तता होत आहे. वाहनाची धावसंख्या अटींची पुर्तता होत तथापि नाही. नियंत्रक शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांनी वाहन क्रमांक MH ०१ AN ४५६७ (होंडा सिटी) हे वाहन दुरुस्त्या करून वापरात ठेवणे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नसल्याचे दिनांक २१ जूलै २०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार विभागातील शासकीय वाहन क्रमांक MH ०१ AN ४५६७ निर्लेखित करण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. हे ज्ञापन शासन निर्णय, विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, १७/४/२०१५ अन्वये प्रस्तुत वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८, भाग-१, उप विभाग-२, अनुक्रमांक नियम क्रमांक ६९ नुसार निर्गमित करण्यात देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

निर्गमित
दिनांक: २६/७

निलिमा
२६/०७/२०२३
( निलिमा रा. परब )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३. कक्ष अधिकारी ( रोखशाखा ) महिला व बाल विकास विभाग मंत्रालय, मुंबई
४. लेखापाल महाराष्ट्र लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता मुंबई/नागपूर विभाग
५. वित विभाग ( विनियम शाखा ), मंत्रालय, मुंबई.
६. नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई.
७. सचिव यांचे स्वीय सहायक, महिला व बाल विकास विभाग मंत्रालय, मुंबई
८. निवड नस्ती (का- १)

महाराष्ट्र शासन

क्र. आस्था -२०२५/प्र.क्र.३२/का-१,
महिला व बाल विकास विभाग, ३ रा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा
मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई- ४०० ०३२
दिनांक:-3 एप्रिल, २०२५

**विषय** :-शासकीय वाहन क्र. एमएच-०१ एएन-१००२ (MARUTI SUZUKI) हे वाहन निर्लेखित करण्याबाबत.

**संदर्भ** :- अधीक्षक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांचे पत्र क्रमांक शापसे /वा.त./ २०२५/५३८, दि.२५.०३.२०२५ रोजीचे पत्र.

**ज्ञापन:-**

या विभागाच्या वापरात असलेले वाहन क्र. एमएच-०१ एएन-१००२ (MARUTI SUZUKI) हे वाहन वारंवार नादुरुस्त होत असल्यामूळे या वाहनाची तपासणी शासकीय परिवहन सेवा, मुंबई या कार्यालयाकडून करुन घेण्यात आली. सदर वाहनाच्या दुरुस्तीवर झालेला खर्च, वाहनाची सद्य:स्थिती, वाहनाची खरेदी किंमत, अपेक्षित दुरुस्तीवरील अंदाजित खर्च व भविष्यातील दुरुस्त्या या बाबी विचारात घेता, एमएच-०१ एएन-१००२ हे वाहन दुरुस्ती करुन वापरात ठेवणे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरणार नसल्याचे अभिप्राय नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रान्वये दिले आहेत.

वाहन क्र.एमएच-०१ एएन-१००२ या वाहनाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

| वाहन क्र. | मॉडेल | खरेदी दिनांक | आयुष्मान | धावसंख्या |
|---|---|---|---|---|
| एमएच-०१ एएन-१००२ | (MARUTI SUZUKI) | ०३.०७.२००९ | १५ वर्षे ८ महिने | १,६०,००० K.M. (अंदाजित) |

२. अधीक्षक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांचे उपरोक्त नमूद अभिप्राय लक्षात घेऊन वाहन क्र.एमएच-०१ एएन-१००२ (MARUTI SUZUKI) हे वाहन निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. हे ज्ञापन शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग दोन, अ.क्र. १९-क, नियम क्र.६९ अन्वये प्रशासनिक विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( निलिमा चौधरी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

अधिदान व लेखा अधिकारी , मुंबई (दोन प्रती)

प्रत:-

१) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
२) कक्ष अधिकारी (रोख शाखा) , महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय, मुंबई
३) लेखापाल, महाराष्ट्र लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता, मुंबई/नागपूर विभाग
४) वित्त विभाग (विनियम शाखा), मंत्रालय, मुंबई
५) नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई
६) सचिव यांचे स्वीय सहायक, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवडनस्ती, कार्यासन-१.